महाराष्ट्र शासन

# तहसिलदार, मूल यांचे कार्यालय

ईमेल : *Tahsildar.Mul@gmail.com* दुरध्वनी क्रमांक 07174 –220310

क्रमांक / कावि/अ.का./तलाठी आस्था/2023/114 दिनांक :- 19.05.2023

# कोतवाल पदभरती – 2023

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक मशा/कार्या-2/आस्था-टे-4/2023/649 दिनांक 04.05.2023

# :- जाहिरनामा -:

सर्व नागरीकांना यावदारे सुचित करण्यात येत कि,मुल तालुक्यातील खालील तलाठी साज्या करीता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातुन कोतवाल पद भरावयाचे आहे.

| अ.क्र. | कोतवाल पद भरावयाचा साझा क्र. व नांव | कोतवाल पद भरावयाची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|
| 1 | मौजा – राजोली त.सा.क्र. 1 | 01 | अनुसुचित जमाती |
| 2 | मौजा – चिखली त.सा.क्र. 6 | 01 | इतर मागास प्रवर्ग |
| 3 | मौजा – केळझर त.सा.क्र. 15 | 01 | अनुसुचित जाती |
| 4 | मौजा – नलेश्वर त.सा.क्र. 17 | 01 | अनुसुचित जमाती |
| 5 | मौजा – नवेगांव भुजला त.सा.क्र. 29 | 01 | इतर मागास प्रवर्ग |
| 6 | मौजा – नांदगांव त.सा.क्र. 30 | 01 | भटक्या जमाती (ड) |

उपरोक्त प्रवर्गातील कोतवाल पदाकरिता इच्छुक स्थानिक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. तरी उमेदवारांनी विहीत नमुन्यात दोन पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज आवश्यक कागदपत्र व पुराव्यासहीत **दिनांक 24 मे, 2023 ते 07 जुन, 2023 रोजी** कार्यालयीन वेळेत तहसिलदार,मुल यांच्या कार्यालयात आस्थापणा शाखेत सादर करावेत व त्याबाबत पोच घ्यावी. अर्जाचा नमुना तहसिल कार्यालयातील आस्थापना शाखेत कार्यालयीन वेळेत व दिवशी उपलब्ध आहे. विहीत तारखे नंतर येणाऱ्या व अपुर्ण भरलेल्या अर्जाचा तसेच जाहीरनाम्याच्या पुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

# :- कोतवाल भरती संबंधी वेळापत्रक -:

1. अर्ज स्विकारण्याची तारीख **24 मे, 2023** ते शेवटची तारीख **07 जुन, 2023** रोजी सांयकाळी 6.15 वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन)
2. अर्जाची छानणी दिनांक 08 जुन, 2023 रोजी दुपारी 11.00 वाजेपासुन तहसिल कार्यालय,मुल येथे करण्यात येईल. पात्र उमेदवारांनी यादीची प्रसिध्दी दिनांक 08 जुन, 2023 रोजी तहसिल कार्यालय, मुल यांचे नोटीय बोर्डावर लावण्यांत येईल.
3. पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा गुरवार दिनांक 15 जुन, 2023 रोजी सकाळी 11.00 ते 12.00 वाजेपर्यंत कर्मवीर महाविद्यालय,मुल येथे घेण्यात येईल. सर्व पात्र उमेदवारांनी आपले अर्जाची पोचपावतीसह परिक्षेस उपस्थित रहाणे बंधनकारक आहे.
4. सदर परिक्षेस आपणास कुठलेही पुस्तकी साहित्य, कॅल्क्युलेट, स्मार्ट वॉच,मोबाईल इत्यादी घेऊन बसता येणार नाही.
5. उमेदवारांची निवड लेखी परिक्षा मिळालेले एकुण गुण लक्षात घेवुन गुणानुक्रमे करण्यात येईल.

# :- कोतवाल भरतीसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे -:

1. उमेदवार ज्या साज्यासाठी अर्ज करीत आहे. त्या साझ्यातील अंतर्भुत असणाऱ्या गावामधील रहिवासी असणे आवश्यक आहे. उमेदवाराने स्थानिक जागेचा रहिवासी असल्याबाबतचे (घर टॅक्स पावती/रेशनकार्ड/निवडणुक ओळखपत्र/मनरेगा अंतर्गत जौबकार्ड/पॅन कार्ड/आधार कार्ड) यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे. या व्यतिरीक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.
2. उमेदवाराचे वय जाहीरनाम्याच्या दिनांकाला कमीत कमी 18 वर्ष व जास्तीत जास्त 40 वर्ष या दरम्यान असावे. (पुराव्या दाखल जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र / पॅन कार्ड /ड्रायव्हीग लायसन्स, यापैकी एखादा पुरावा जोडणे आवयक आहे.) या व्यतिरीक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.
3. उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता इयता किमान 4 थी पास असणे आवश्यक आहे.
4. उमेदवार शारिरिक दुष्टया सक्षम असावा, नियुकती नंतर जिल्हा मेडिकल बोर्डाचे / चिकीत्सक प्रमाणपत्र 1 (एक) महिण्यात उमेदवाराला सादर करावे लागेल. त्याची जवाबदारी उमेदवाराची असेल.सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यात येईल.
5. उमदवाराने चारित्र्याबाबत सबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर सादर करावे. सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यात येईल.
6. सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र न जोडलेल्या अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. **तसेच उमेदवाराला नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुर्व सुचना न देता कोणतेही कारन न देता कोणतीही वेळी नियुकती रद्द (समाप्त) करण्यात येईल.**

7. अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच निवड प्रक्रिये दरम्यान कुठलाही दबाव आणल्यास आपली निवड रद्द करण्यांत येईल.
8. अर्ज हा अर्जदारानेच वैयक्तिक स्वत:हजर राहुन सादर करावा. अर्ज पोस्टाव्दारे पाठविण्यात येवु नये.
9. अपुर्ण माहीतीचे अर्ज रद्द करण्यात येईल.त्याबाबत कोणतेही पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.
10. अर्जामधील माहिती खोटी आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल. किंवा नियुक्ती झाल्यानंतर ती रद्द करण्यात येईल.
11. कोतवाल हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेही निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील.
12. कोतवाल पदासाठी होणारी लेखी परिक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची राहील.
13. विहीत नमुन्यातील अर्जतहसिल कार्यालय,मुल येथे 50/- शुल्क भरून उपलब्ध होईल. (विहीत नमुन्यातील अर्जच स्विकारण्यात येईल.)
14. साज्या बाहेरील अर्जाचा विचार केला जानार नाही व तो अपात्र रण्यात येईल.
15. ज्या अर्जदाराचे अर्ज पात्र ठरतील त्याच उमेदवाराची 100 गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रक्रिया शुल्क :- उमेदवारांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | खुला प्रवर्गातील उमदवारांसाठी | मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | रू. 500/- (रू.पाचशे मात्र/-) | रू. 300/- (रू.पाचशे मात्र/-) |

16. पात्र उमेदवारास मुळ प्रमाणपत्रे आणणे आवश्यक आहे.
17. अर्जदाराला निवड प्रक्रियेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

वरिल सर्व अटी व शर्तीना अनुसरून तहसिलदार,मुल नियुक्ती अधिकारी व जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचा निर्णय अंतिम राहिल.

दिनांक :- 19 मे, 2023

( डॉ. रविंद्र होळी )
तहसिलदार,मुल

प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.

1. मा.जिल्हाधिकारी,चंद्रपूर
2. मा.उपविभागीय अधिकारी,मुल

प्रतिलिपी – माहीती तथा नमुद दिलेल्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत.

1. जिल्हा सुचना व विज्ञाण अधिकारी जि.का.चंद्रपूर यांनी NIC वर सदर जाहिरनाम्याची एक प्रत प्रसिध्द करावी.
2. गट विकास अधिकारी पंचायत समिती, मुल यांनी नोटीस बोर्डावर लावुन प्रसिध्द करावी. व प्रसिध्द प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.
3. तलाठी साझा राजोली, चिखली, केळझर, नलेश्वर, नवेगांव भुजला, नांदगांव यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीय अग्रेर्षीत. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना

फलकावर लावून व साझ्यातील सर्व गावांत तशी प्रसिध्दी / मुनादी देवुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

4. सचिव ग्रामपंचायत **राजोली, चिखली, केळझर, नलेश्वर, नवेगांव भुजला,** नांदगांव यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीय अग्रेषींत. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

5. प्रेशक शाखा, तहसिल कार्यालय,मुल यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

( डॉ. रविंद्र होळी )
तहसिलदार,मूल